**Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,**
**Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/428
दिनांक :-29/05/2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- उच्च माध्यमिक (इ.12वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्र आणि मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे वितरणाबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्र आणि मार्च 2024 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची योग्यता प्रमाणपत्रे संबंधित वितरण केंद्रावर सोमवार दि.05/06/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर सर्व गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्रे आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र किंवा योग्यता प्रमाणपत्रे प्राप्त न झालेस दि.07/06/2023 अखेर मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तद्नंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च 2023 परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका व स्थलांतर प्रमाणपत्रांचे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात सोमवार दि.05/06/2023 रोजी दुपारी 3.00 नंतर वाटप करण्यात यावे.

**(दत्तात्रय शंकर पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**